“लातूर जिल्ह्यातील प्राथमिकशाळामधील भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा कृती कार्यक्रम विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीच्या अंशतः पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

पटेल हिनाकौसर बालनसाब

[एम.ए.एम.एड. सेट (शिक्षणशास्त्र)]

सहा. प्राध्यापक

जयक्रांती अध्यापक महाविद्यालय लातूर

मार्गदर्शक

डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे

[एम.एस्सी., एम.एड., एम.फिल., पीएच.डी. (शिक्षणशास्त्र व गणित)]

प्राचार्य

जयक्रांती अध्यापक महाविद्यालय, लातूर

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१९

अनुक्रमणिका

अ.क्र.	विवरण	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	१
२	समस्या विधान	२
३	संशोधनातील संकल्पनाच्या कार्यात्मक व्याख्या	२
४	संशोधनाची उद्दिष्टे	३
५	संशोधनाची गरज	३
६	संशोधनाचे महत्व	४
७	संशोधनाची व्याप्ती	४
८	संशोधनाची मर्यादा	५
९	संशोधनाची गृहितके	५
१०	संशोधनाची परिकल्पना	५
११	संशोधन पध्दती	६
१२	नमुना निवड- आकार व स्वरूप	६
१३	संशोधनाची साधने	७
१४	कृती कार्यक्रम	७
१५	कृती कार्यक्रम उद्दिष्टे	७
१६	प्रत्यक्ष कार्यवाही	८
१७	संशोधनाचे वेळापत्रक	९
१८	खर्चाचे अंदाजपत्रक	९
१९	संदर्भग्रंथ	१०-११

१. प्रस्तावना :

एकवीसावे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक आहे. त्यामूळे आज शिक्षण क्षेत्रात नवनवीन अभिनव आनंददायी प्रयोग केले जात आहेत. बालकांचा निकोप सर्वांगीण विकास अनुकूल प्रसन्न शैक्षणिक वातावरण अल्हाददायक व स्वच्छ शालेय परिसर या बाबीकडे लक्ष केंद्रीत झाले आहे. तसेच शिक्षण घेणाऱ्या बालकांनी स्वतःच्या ईच्छेनुसार स्वतःच्या आवडीनुसार स्वतःला आकार देत आहे. शिक्षकाने केवळ मित्र म्हणून त्याला दिशा दर्शनाचे काम करावे लागत आहे.

शिक्षण क्षेत्रातील हे परिवर्तन प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी आवश्यक आहे. शासनाने बालकांचे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचाअधिकार अधिनियम २००९ लागू केला आहे.त्यात ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास प्राथमिक शिक्षण हे मोफत देणे सक्तीचे व बंधनकारक केले आहे. याची अंमलबजावणी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नुसार ज्ञानरचनावादाचा स्विकार केला आहे. त्यामुळे बालक स्वतःच्या ज्ञानाचा स्वतः रचनाकार आहे. हे ओळखून महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अभूतपुर्व क्रांतीकारक बदलासाठी अधिनियमाची अंमलबजावणी १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशात सुरु झाली आहे.

महाराष्ट्र राज्याने शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासुन प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या ऐतिहासिक प्रयोगाची प्रभावी अंमलबजावणी होत असल्यामुळे शिक्षण पध्दतीत अमुलाग्र नाविन्यपूर्ण बदल होत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना भाषा विषयातील श्रवण, भाषा, वाचन, लेखन आणि अभिव्यक्ती या क्षमता १०० टक्के प्राप्त होणे अपेक्षित आहे. या क्षमतांची संपादणूक पातळी ही प्रभुत्व पातळीपर्यंत नेणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील एक ही मूल अप्रगत राहू नये यासाठी विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमतांची नियमित पडताळणी करुन शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विविध कृती कार्यक्रमांचे आयोजन करणे अभिप्रेत आहे.

शिक्षण क्षेत्रात कार्य करतांना विविध शैक्षणिक समस्या सतत जाणवतात. त्यात प्रभावी व परिणामकारक अध्ययन, अध्यापन, विविध कौशल्ये आणि क्षमतांचा विकास, आकर्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती, इतर तंत्रज्ञानाची माहिती, दृकश्राव्य साधनांचा वापर इ. समस्या जाणवतात. म्हणून

प्रस्तुत संशोधनात भाषा विषयात अप्रगत विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा शोध घेवून कृती कार्यक्रमाचे विकसन करुन त्याची परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

२. समस्या विधान :

"लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा कृती कार्यक्रम विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास"

३. संशोधनातील संकल्पनाच्या कार्यात्मक व्याख्या :

१. लातूर जिल्हा :

महाराष्ट्र राज्यातील प्रशासकीय विभाग औरंगाबाद मधील व शिक्षण विभाग लातूर मधील शैक्षणिकदृष्ट्या एक अग्रेसर असलेला जिल्हा यात एकुण १० तालुके व एक महानगर पालिका यांचा समावेश आहे.

२. प्राथमिक शाळा :

लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद यांचे अधिनस्त असलेल्या प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था असलेली शाळा.

३. भाषा विषय :

लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमातील एक क्रमिक विषय. ज्या विषयातून विद्यार्थ्यांच्या विविध भाषिक क्षमता, कौशल्य यांचा विकास होणे अपेक्षित आहे असा विषय.

४. अप्रगत विद्यार्थी :

लातूर जिल्ह्यातील इ. ७ वी च्या वर्गातील भाषा विषयात संशोधकान तयार केलेल्या पुर्व चाचणीत ४० टक्केपेक्षा कमी गुण प्राप्त करणारा विद्यार्थी.

५. **कृती कार्यक्रम :**

लातूर जिल्ह्यातील इ. ७ वी च्या वर्गातील भाषाविषयात संशोधकाने केलेल्या पुर्व चाचणीत ४० टक्के पेक्षा कमी गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुख्यभाषिक क्षमता विकसित करण्यासाठी तयार केलेला कृती कार्यक्रम.

६. **क्षमता :**

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००५ नूसार प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता अभिप्रेत असलेल्या मुख्य भाषिक क्षमता, श्रवण, भाषण, वाचन, लेखन.

४. संशोधनाची उद्दिष्टे :

१. इयत्ता ७ वी च्या भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

२. इयत्ता ७ वी च्या भाषाविषयात अप्रगत विद्यार्थ्यांचा पुढील मुख्य भाषिक क्षमतांचा अभ्यास करणे.

अ. श्रवण

ब. भाषण

क. वाचन

ड. लेखन

३. प्राथमिक शाळामधील इयत्ता ७ वी च्या विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम विकसित करुन अंमलबजावणी करणे.

४. इयत्ता ७ वी च्या भाषाविषयातील अप्रगत विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

५. संशोधनाची गरज :

"शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे, जो कोणी हे प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले. त्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे. समाजातील कुठलाही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही म्हणून प्रस्तुत संशोधनाची अत्यंत गरज संशोधकाला वाटते. कारण संशोधक हा शैक्षणिक परिवेशामध्ये वास करीत आलेला आहे. वडील गुणवत्ता वाढीचे व

प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे व आई शिक्षिका म्हणून काम करीत असल्यामुळे अगदी बालपणापासूनच शाळा, विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, मूल्यमापन या सर्व बाबी वारंवार ऐकल्या व अनुभविल्या आहेत. या सर्व बाबींचा परिपाक म्हणून हा विषय संशोधनासाठी घेण्याची गरज वाटली.

६. संशोधनाचे महत्व :

शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे असे म्हटले जाते. कारण शिक्षणामूळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. हा विकास होत असतांना तो विकास हा संतुलित होणे अत्यंत महत्वाचेअसते. कारण समाजामध्ये आपल्या स्वतःचे योग्य प्रकारे समायोजन करु शकतो व त्याची वाढ व विकास होत असतांना फक्त शरीराचा विकास होऊन चालत नाही. तर त्याच्या मानसिकतेचा विकास होणे गरजेचे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक विकास समतोल पध्दतीने झाला पाहिजे तेव्हां तो विद्यार्थी आपल्या बुध्दीचातुर्याने समाजामध्ये समायोजन साधू शकतो. हे सर्व होण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या योजनेअंतर्गत सर्व घटकाचा संतूलित विकास झाला पाहिजे म्हणून वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. त्याअंतर्गत अप्रगत विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम देऊन प्रगत करण्याची गरज वाटते.

७. संशोधनाची व्याप्ती :

१. स्थळ व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यापुरते व्याप्त राहील.

२. क्षेत्र व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषद शाळा क्षेत्रापुरतेच व्याप्त राहील. प्रत्येक तालुक्यातील १० टक्के शाळांचा यामध्ये समावेश राहील.

३. आशय व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात लातूर जिल्ह्यातील इ. ७ वी च्या अप्रगत विद्यार्थ्यांचा अभ्यास केला आहे.

४. कालावधी व्याप्ती :

सदर संशोधन हे १६ जून २०१६ ते ३१ मार्च २०१९ या कालावधी करीता व्याप्त असेल.

८. संशोधनाची मर्यादा :

१. स्थळ मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्ह्यापूरतेच मर्यादित आहे.

२. क्षेत्र मर्यादा :

प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषद शाळा क्षेत्रापुरतेच मर्यादित राहील.

३. आशय मर्यादा :

प्रस्तुत संशोधनात लातूर जिल्ह्यातील इ. ७ वी च्या अप्रगत विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

४. कालावधी मर्यादा :

सदर संशोधन हे १६ जून २०१६ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीपुरतेच मर्यादित आहे.

९. संशोधनाची गृहितके :

१. जिल्हा परिषद शाळेमध्ये इयत्ता ७ वी च्या वर्गामध्ये भाषा विषयात अप्रगत विद्यार्थी आहेत.

२. इयत्ता ७ वी मधील अप्रगत विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता पूर्णतः विकसित झालेल्या नाहीत.

अ. श्रवण

ब. भाषण

क. वाचन

ड. लेखन

१०. संशोधनाची परिकल्पना :

१. इ. ७ वी च्या भाषाविषयात अप्रगत मुले आणि मुली मधील खालील क्षमतानुसार लक्षणीय फरक नाही.

अ. आकलन व वाचन

ब. भाषण

क. वाचन

ड. श्रुतलेखन

इ. स्व-अभिव्यक्ती

२. इयत्ता ७ वी च्या भाषाविषयातील अप्रगत मूलांच्या पूर्व चाचणीच्या गुणात लक्षणीय फरक नाही.

३. भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानात लक्षणीय फरक नाही.

११. संशोधन पध्दती :

सदर संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

१२. नमुना निवड : आकार व स्वरुप.

नमुना निवड पध्दती : सुगम यादृच्छिक नमुना निवड खालील सारणीत दाखविल्याप्रमाणे १०% शाळा, शिक्षक, विद्यार्थी आणि मुख्याध्यापक यांची निवड न्यादर्श म्हणून पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

अ.क्रं.	तालुका	शाळा	विद्यार्थी	शिक्षक	मुख्याध्यापक	एकुण
१	लातूर	०८	६४	०८	०८	८८
२	निलंगा	१०	७९	१०	१०	१०९
३	औसा	०९	६९	०९	०९	९६
४	उदगीर	०६	५५	०६	०६	७३
५	अहमदपूर	०६	५२	०६	०६	७०
६	चाकूर	०५	३१	०५	०५	४६
७	रेणापूर	०४	२९	०४	०४	४१
८	शिरुर अनंतपाळ	०३	२४	०३	०३	३३
९	जळकोट	०३	२२	०३	०३	३१
१०	देवणी	०३	२०	०३	०३	२९
एकूण		**५७**	**४४५**	**५७**	**५७**	**६१६**

वरील शाळांची निवड केल्यानंतर वेळेची मर्यादा लक्षात घेता प्रत्येक तालुक्यातील एकच शाळेची निवड करून त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करून संशोधक निष्कर्षाप्रत पोहचेल.

लातूर जिल्ह्यातील एकूण ५७ शाळा, ५७ वर्ग, ५७ शिक्षक आणि ५७ मुख्याध्यापक तसेच इयत्ता ७ वी च्या वर्गात शिकणारे ४४५ विद्यार्थी असे एकूण ६१६ व्यक्तींची सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने न्यादर्श म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

१३. संशोधनाची साधने :

१. शाळा/तालुका/क्षमता दर्शक अप्रगत विद्यार्थी दर्शक प्रपत्र

२. अप्रगत मूलांचा दर्शक कोष्टक

३. तालुका निहाय अप्रगत मुले दर्शविणारा आलेख

४. उद्दिष्टनिहाय माहिती निरीक्षण व विश्लेषण दर्शक तक्ता

५. उत्तरचाचणी/ पूर्वचाचणीसाठी पायाभूत प्रश्नावली

६. कृती कार्यक्रमासाठी निवडलेल्या केंद्रातील विद्यार्थी निरीक्षण व विश्लेषण तक्ता

- **माहिती विश्लेषणासाठी वर्णनात्मक विश्लेषण तंत्रातील सरासरी, शेकडेवारी व आलेख या संख्याशास्त्रीय तंत्राचा अवलंब केलेला आहे.**

१४. कृती कार्यक्रम :

- **कालावधी :** ३० सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०१७
- **शाळा संख्या :** लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यातील १० शाळा
- **शिक्षक संख्या :** १०
- **विद्यार्थी संख्या :** ५२

१५. कृती कार्यक्रम उद्दिष्टे :

१. इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांची श्रुत लेखनाची क्षमता विकसित करण्यासाठी विविध ज्ञानरचनावादी उपक्रमांचे आयाजन करणे.

२. इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विकसित करण्यासाठी नाविन्यपूर्ण कृतीयुक्त उपक्रमाद्वारे मार्गदर्शन करणे.

३. इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांमध्ये स्वअभिव्यक्ती क्षमता विकसित करण्यासाठी विविध शैक्षणिक साहित्याचे व भाषिक क्षमतांचे आयोजन करणे.

१६. **प्रत्यक्ष कार्यवाही :**

* लातूर जिल्ह्यात १० तालुके आहेत. त्या १० तालुक्यात एकूण १२८४ शाळा आहेत. त्यापैकी ७ वी चे वर्ग असलेल्या ५४६ शाळा आहेत.

* वेळेची मर्यादा लक्षात घेता संशोधकाने प्रत्येक तालुक्यातील एक शाळेची निवड कृतीकार्यक्रमासाठी करण्याचे ठरवले आहे.

* कृती कार्यक्रमाचा कार्यकाल ३ महिन्यांचा ठरवण्यात आला आहे.

* संशोधक स्वत: हा मार्गदर्शकाच्या सुचनेनुसार भाषाविषयाच्या कृती कार्यक्रम संदर्भात व तज्ञांच्या सुचनेनुसार एक कृती कार्यक्रम तयार करेल.

* तसेच हा कृती कार्यक्रम राबवण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या सोबत चर्चा करून विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली तयार करून ती प्रमाणित करून घेईल.

* कृती कार्यक्रमासाठी संबंधित शाळेत संशोधक पूर्व चाचणी रूपाने विद्यार्थी भाषा विषयात कोणकोणत्या क्षमतेत अप्रगत आहेत यांचा शोध घेईल. त्यानुसार शाळेत राबवण्यासाठीचा कृती कार्यक्रम तयार करेल.

* तयार केलेल्य कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी शिक्षका मार्फत करून घेईल.

* पूर्ण कालावधीत कृती कार्यक्रम राबवल्यानंतर उत्तर चाचणी देवून मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या प्रतिसादानुसार निष्कर्ष प्रत येईल.

* तसेच संशोधक निष्कर्षानुसार शिफारशी करेल.

१७. संशोधनाचे वेळापत्रक :

अ.क्रं.	विवरण	कालावधी
१	संदर्भ ग्रंथाचे वाचन	जून २०१६ ते डिसेंबर २०१६
२	संबंधित संशोधनाचा आढावा	जानेवारी २०१७ ते जून २०१७
३	प्रत्यक्ष कृती कार्यक्रम	जूलै २०१७ ते डिसेंबर २०१७
४	प्राप्त सामग्रीचे अर्थनिर्वचन व विश्लेषण	जानेवारी २०१८ ते जून २०१८
५	विश्लेषणावरुन निष्कर्ष काढणे	जूलै २०१८ ते डिसेंबर २०१८
६	अंतिम संशोधन सारांश तयार करुन सादर करणे	जानेवारी २०१९ ते जून २०१९
७	टायपिंग करुन प्रबंध सादर करणे	जूलै २०१९ ते डिसेंबर २०१९

१८. खर्चाचे अंदाजपत्रक :

अ.क्रं.	विवरण	खर्च
१	संदर्भग्रंथ खरेदी	३००००/-
२	प्रवास खर्च	२००००/-
३	संशोधन साधने तयार करणे	५०००/-
४	झेरॉक्स	५०००/-
५	टायपिंग व बायंडिंग	२००००/-
	एकूण खर्च	**८००००/-**

१९. संदर्भग्रंथ :

१. मैत्री ज्ञानरचनावादाशी-राजश्री बाम व शीला कोल्हाटकर, निराली प्रकाशन, पुणे-१३.

२. रचनावाद- नामदेव माळी, प्रतिभा रानडे, क्षेत्र प्रकाशन, सातारा-१५

३. रचनावादी शिक्षण- श्री रमेश पानसे, २०१० पुणे.

४. ज्ञानरचनावाद- जाधव एच.व्ही. संजीवनी प्रकाशन, सातारा-२०१५.

५. शैक्षणिक संशोधनाची मूल्यतत्वे- मूळे, उमाठे, श्री. विद्या बुक्स प्रकाशन औरंगाबाद. १९९८

६. शैक्षणिक संशोधन, बापट, भा.गो., नुतन प्रकाशन पुणे, १९८६.

७. संशोधन मार्गदर्शक मालिका (पुष्प १ ते १४) य.म.म.मु.विद्यापीठ नाशिक

८. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५ ncert नवी दिल्ली.

९. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क २००९ MSCERT पुणे.

१०. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, शिक्षण मार्गदर्शिका २०१० MSCERT पुणे.

११. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २००४ MSCERT पुणे २००६.

१२. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२- MSCERT पुणे २०१२.

१३. लघुसंशोधन मार्गदर्शिका २०१२- MSCERT पुणे.

१४. कृतीसंशोधन मार्गदर्शिका २०१२ MSCERT पुणे.

१५. रचनावादी शिक्षणाची तत्वे- रमेश पानसे, जीवन शिक्षण अंक, पुणे-२०१६.

१६. कुमठे बीटचा रचनावादी प्रवास-प्रतिभा भराडे, MSCERT पुणे २०१६.

१७. प्रत्येक शाळेसाठी शाळेतील प्रत्येकासाठी रचनावाद- पाटेकर ए.एच. MSCERT पुणे २०१६.

१८. शोध प्रस्तावाचा दिशा प्रगतीच्या- जयस्वाल एस.पी. MSCERT पुणे २०१६.

१९. शिकूया, शिकवू या दडपणा विना - पठाण यु.जी. MSCERT पुणे २०१६.

२०. अध्यापक नव्हे, शिल्पकार- दत्तात्रय तापकीर- MSCERT पुणे २०१६.

२१. रचनावाद समजून घेताना-तृप्ती अंधारे- MSCERT पुणे २०१६.

संशोधक

पटेल हिनाकौसर बालनसाब

मार्गदर्शक

डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे

Dr. G.T. Khurpe
Research Guide
S.R.T.M.U. Nanded